अबोली

अवेळी आबोली
कशी ही फुलली
भावना बोलली

नदीच्या किनारी
लाटांचा एकांत
वाऱ्याला का खंत?

आकाशात चंद्र
पडला एकाकी
म्हणून का दुःखी?

चंद्राच्या भोवती
एक ना तारका
शोधतो सारखा!

पाण्यात पडले
गोड प्रतिबिंब
नभातले टिंब

वाळूतले  चित्र
पुसले लाटांनी
वार्ता कानोकानी

वेल सुकलेली
पाचोळा बागेत
दुःख हे मुळांत

फांद्या मी छाटल्या
कुंडीत रोवल्या
अंकुरात न्हाल्या

फुलांची पालखी
वाऱ्याच्या संगती
हासे तृणपाती

– प्रकाश रामचंद्र क्षीरसागर